ISSN 2394-5303

Printing Area
UGC
Jr.No.43053
UGC Approved Refereed Journal

Issue-36, Vol-06, December-2017

International Multilingual Research Journal

Printing Area

Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

आंतरराष्ट्रीय बहुभाषिक शोध पत्रिका

प्रिंटिंग एरिया

Printing Area International Interdisciplinary Research Journal in Marathi, Hindi & English Languages

December 2017, Issue-36, Vol-06

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

Co-Editor
Dr. Ravindranath Kewat
(M.A. Ph.D.)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) SUSTAINABLE DEVELOPMENT GOALS (SDGs):INDIA'S STATUS IN ACHIEVING GOAL-3
Dr K. Mary Sujatha—Ms. Freya Christina, Visakhapatnam, A.P. || 66

15) Globalisation and Indian Agriculture–A Critical Study on Outcomes
Dr. H.P. Singh Saluja—Mr. Pratik Kumar Sharma, Durg (C.G.) || 70

16) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचे शेतकऱ्यांविषयीचे कार्य
प्रा.डॉ.बोडखे एस.एस., ता.खंडाळा जि.सातारा || 74

17) पोलीसांवरील वाढते हल्ले:एक समाजशास्त्रीय अध्ययन
प्रा.दिपक राघोजी दामोदर, वाशिम || 78

18) मानवी जीवनात ईश्वराचे स्थान
डॉ. वेदप्रकाश डोणगांवकर, वाशिम || 82

19) 'लुपिन ग्रामोदय' च्या जलदूताची जनजागृती
प्रा. किरण मोहिते, पिंपरी पुणे || 85

20) समाजवादी विचारवंत नानासाहेब गोरे यांचे ब्रिटनमधील भारताचे हायकमिशनर कार्य
प्रा. डॉ. मोकाटे नाथा रामभाऊ, आंबेगाव,जि.पुणे || 87

21) दि. बा. मोकाशी यांचे नवकथेतील स्थान:—एक अभ्यास
धनराज नारायण सावरकर, भारसिंगी || 93

22) रामायण में वाल्मीकि की भाव सृष्टि
Dr. Ashu Gautam, Chandigarh || 95

23) बुक्सा जनजाति एक सांस्कृतिक अध्ययन
टीना भड़ाना, मुजफ्फरनगर || 101

24) डॉ.परशुराम शुक्ल के बाल काव्य में पर्यावरण चेतना
धर्मेंद्र कुमार जाटव, ग्वालियर (म.प्र.) || 103

25) पर्यावरण संरक्षण के संवैधानिक आधार
डॉ० धीरज कान्त, वाराणसी || 106

26) हिन्दी भाषा की भूमिका भूमंडलीकरण और बाज़ारवाद के परिप्रेक्ष्य में
डॉ. आर. के. जाधव, तह. एवं जिला धुलियाँ (महाराष्ट्र) || 111

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

18

मानवी जीवनात ईश्वराचे स्थान

डॉ. वेदप्रकाश डोणगांवकर
तत्त्वज्ञान विभाग प्रमूख
एम.एस.गोटे कॉलेज, वाशिम

मानवी जीवनात ईश्वर आहे का? तो कसा आहे? तो काय करतो? इत्यादी प्रश्न मुळात निरर्थक ठरतात. कारण जे अस्तित्ववान नाही, जे अनुभवाला येत नाही त्या विषयी प्रश्न कसले? त्या विषयी चर्चा कसली? परंतु ईश्वरवाद्यांना ही भूमिका पटणार नाही. कारण ते सृष्टीचा संचालक म्हणून, मानवी कर्माचे नियंत्रक किंवा फळदाता म्हणून ईश्वराचे अस्तित्व मान्य करतात. म्हणून ईश्वर कसा आहे? असा प्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नाच्या अनुषंगाने ईश्वरवादी निर्गुण - सगुणाचा दाखला देतात. पण ईश्वराला निर्गुण म्हणावे तर त्याच्या कोणत्याही गुणांचा प्रत्यक्ष अनुभव आपल्याला येत नाही. जर त्याला सगुण मानावे तर तो कोणत्या स्वरुपात आहे? असा प्रतिप्रश्न उपस्थित होतो. या प्रश्नांच्या अनुषंगाने ईश्वरवादी मूर्तीच्या स्वरुपात, संत-महात्मा-महापुरुषांच्या रुपात किंवा पूर्वजांच्या आत्म्यांच्या रुपात ईश्वराचे अस्तित्व सिध्द करण्याचा प्रयत्न करतात. परंतु वैज्ञानिक दृष्ट्या काही बाबी निरर्थक ठरतात तर काही बाबींचा संदर्भ मानवी अस्तित्वाशी जुळतच नाही. विशेष म्हणजे जर श्रद्धे पायी संदर्भ जुळला तरी वैयक्तिक समाधानाशिवाय त्यातून दुसरे काही लाभत नाही. म्हणजेच सगुण ईश्वराची कल्पना ही पुर्णतः मानसिक आवस्था ठरते. परंतु ही अवस्था सत् भासत असली तरिही वास्तविक नसते. कारण श्रध्दा रुपी मानसिक आवस्था ज्ञान ठरत नाही.

ईश्वरवादी सृष्टीचा संचालक म्हणून ईश्वराचे अस्तित्व स्विकारतातच शिवाय बुद्धीवादी सुध्दा सृष्टीचा संचालक कोणीतरी किंवा काही तरी असले पाहीजे असे मानतात. तेव्हा काही तरी आहे! असे म्हणत असताना, काहीही नाही असे म्हनने अधिक सोयीचे वाटते. परंतु यामुळे कार्य-कारण संबंधाच्या संदर्भात काही अपवाद असतात काय? असा प्रश्न निर्माण होईल. या प्रश्नाच्या अनुषंगाने काही बाबतीत काही विषय अपवादात्मक असतात हे मानन्याबाचुन पर्याय उरत नाही. असे म्हटल्यास चूकिचे ठरणार नाही. अर्थात सृष्टीचा कोणीतरी संचालक आहे किंवा तो अमुक कोणीतरी आहे हा विषय अपवादात्मक आहे. म्हणजेच ईश्वर किंवा इतर कोणीतरी आहे असे म्हणत असताना ते कसे आहे? हे सांगता न येण्याची ही परिस्थिती आहे. एकंदर सृष्टीच्या संचालकाचा विषय अज्ञेय आहे.

ईश्वरवादी मानवी कर्माचे नियंत्रक किंवा फळदाता म्हणून सुध्दा ईश्वराचे अस्तित्व मान्य करतात. त्यांच्या दृष्टीने मानवाच्या प्रत्येक कर्माचा हिशोब ईश्वराकडे असतो. धर्मशास्त्राने सांगितल्या प्रमाणे आचरण करणा-याला ईश्वर स्वर्गाचे किंवा मुक्तीचे व्दार खुले करुण देतो. या सारख्या भाकड कथांवर त्यांचा विश्वासही बसतो. परंतु त्यांच्या लक्षात हे येत नाही की काही अपवाद वगळता आपण सामान्य लोक आपल्या स्वतःच्या किंवा आपल्या कुटुंबीयांच्याच कर्मावर नियंत्रण ठेवू शकत नाहीत, तर ईश्वराला आपल्या सर्वांच्या कर्मावर नियंत्रण ठेवणे आणि कर्मानुसार फळ देणे कसे शक्य होईल? आणि जर कोणी म्हणत असेल की ईश्वराला हे शक्य आहे, तर आपली न्याय व्यवस्था निरर्थक ठरणार नाही का? आणि जर ही न्याय व्यवस्था निरर्थक ठरत असेल तर त्या ईश्वरवाद्याने आपल्या या न्याय व्यवस्थेला बंद पाडण्यासाठी समोर का येवू नये? असे अनेक प्रश्न उपस्थित होतील.

दुसरी बाब अशी की आजच्या विज्ञान युगात आपले लोक चंद्र, मंगळ आदी ग्रहांचा शोध लावून तेथे जावून येतात. मग स्वर्ग वा नरका सारख्या विश्वाचा शोध का लागत नाही? असाही प्रश्न उपस्थित होतो.एकंदर मानवी कर्माचा नियंत्रक वा फळदाता म्हणूनही ईश्वराकडे पहाणे म्हणजे अंधा-या खोलीत सावली पकडण्यासारखे होईल. परंतु असे असले तरिही या जगातील असंख्य लोक ईश्वर या अवास्तविक कल्पनेकडे का झुकलेले दिसुन येतात? हा एक प्रश्नच नव्हे तर गंभीर समस्या देखिल

आहे. तेव्हा या समस्येचे समाधान शोधण्यासाठी तात्त्विक विवेचन करण्याऐवजी मानसशास्त्रीय दृष्टिकोन बाळगणे अधिक प्रासंगिक ठरेल. परंतु मानसशास्त्रीय दृष्टिने सुध्दा विचार केला असता मानवी जीवनातील ईश्वराचे अस्तित्व अर्थपूर्ण वाटत नाही. कारण जग प्रसिध्द मनोवैज्ञानिक सिग्मन फ्राईडच्या मते 'God is an illusion' म्हणजेच 'ईश्वर संकल्पणा भ्रामक आहे'. याशिवाय मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून देकार्तच्या 'I think, there fore I am' या विधानाचाही येथे उपयोग करुन घेता येईल. देकार्तच्या दृष्टीने 'मी विचार करतो, म्हणून ईश्वर आहे.' असेही म्हणता येईल. परंतु या ठिकाणचा मी अस्तित्ववान तर ईश्वर संशयात्मक पद असल्यामुळे प्रश्न निर्माण होतो की, आपले लोक ईश्वरासंबंधी विचार करतातच कशाला? या प्रश्नांच्या संदर्भात कारण सिध्दांत हा एक पर्याय आहे. म्हणजेच मानवी जीवनात ईश्वराचे अस्तित्व या कार्याच्या कारणाचा वैज्ञानिक पध्दतीने शोध घेणे आता महत्वाचे वाटू लागते.

कार्य-कारण सिध्दांतानुसार प्रत्येक कार्याला कारण असते. कारणा शिवाय कार्य घटना घडू शकत नाही. साधारणपणे आपण एका कार्याला एकच कारण असते असे मानून चालतोत. परंतु मिल्ल या तत्त्वाज्ञानी, एका कार्यासाठी अनेक कारण असतात. असे मानले आहे. कारणांची अणेकता सिध्द करीत असताना मिल्ल कारणांचे भावात्मक व अभावात्मक असे दोन प्रकार करतो. मिल्ल ची ही भूमिका मानवी जीवनात ईश्वराचे अस्तित्व का आहे? किंवा मानव ईश्वराचा विचार का करतो? हे सिध्द करण्यासाठी उपयुक्त ठरेल. म्हणजेच उपरोक्त प्रश्नांच्या अनुषंगाने श्रध्दा, विश्वास याशिवाय चिंता, भीती, दुःख इत्यादी कारणे भावात्मक ठरतील तर संशय, निर्भीडता, आत्मविश्वास, वैज्ञानिक दृष्टिकोन इत्यादी कारणे अभावात्मक ठरतील. निश्चितच या ठिकाणची ही कारणे मानसिक स्वरुपाची असली तरीही त्यांचा संबंध जड भौतिक शरीराशी किंबहुना व्यावहारीक जीवनाशी असतो. हे विसरुन चालणार नाही आणि म्हणून या कारणांची येथे चर्चा करणे आवश्यक होवून जाते. सामान्यतः श्रध्दा, विश्वास एकाच अर्थाने प्रयोगली जाणारी दोन वेगवेगळी शब्द आहेत. जॉन ड्यूई यांच्या मते, 'पुराव्या अभावी एखादी गोष्ट स्विकारण्याची आपल्या मनाची दृढ इच्छा म्हणजे श्रध्दा होय'. निश्चितच ड्यूईची ही व्याख्या ईश्वराला अनुसरून आहे. परंतु श्रध्देच्या दुस-या प्रकारा नुसार 'पुराव्याच्या आधारे केलेले निर्धारण म्हणजे श्रध्दा होय'. म्हणजेच या मतानुसार श्रध्दा परिवर्तनीय असते. एकंदर श्रध्देच्या आधारेच ईश्वर अस्तित्ववान ठरतो. शिवाय ईश्वराचे स्वरुपही श्रध्दे नुसार बदलत जाते हे या ठिकाणी लक्षात येते.

चिंता ही बाब तशीतर मानवी स्वभावाशी निगडीत असलेली बाब आहे. परंतु ती प्रमाणा बाहेर झाली तर समस्या ठरते. सामान्यतः वैयक्तिक, कौटुंबिक आणि सामाजिक या तीन प्रकारच्या चिंता मानवी जीवनाच्या अनेक विषयांपैकी एक आहेत. कौटुंबिक आणि सामाजिक चिंता या सामन्यतः भौतिक घटकाशी असतात. (उदा. उदरनिर्वाह, संघर्ष इत्यादी) पण वैयक्तिक चिंता ही भौतिक आणि अभौतिक किंवा वर्तमान आणि भविष्यकालीन घटकाशी संबंधीत असतात. (उदा. स्वअस्तित्व, मृत्यू) मनुष्य स्वअस्तित्वा विषयी काही प्रमाणात चिंतीत असतो परंतु तो मृत्यू विषयी आणि मृत्यू पश्चातच्या विषयांप्रती प्रमाणाबाहेर चिंतीत होतो. अशा प्रकारच्या या चिंते पासून मुक्त होण्यासाठी तो ईश्वर या घटकाचा आधार घेतो.

प्रमाणा बाहेरील चिंता म्हणजेच भीती होय. मनुष्य हा इंद्रियांना प्रतीत होणारे भौतिक जीवन, सामाजिक प्रथा आणि धार्मिक कथा यासर्व घटकांचा जेव्हा अनुभव घेतो तेव्हा नकळत तो मानवी अस्तित्वाबद्दल चिंतीत होतो आणि स्वअस्तीत्वा बद्दल भयभीत होतो. तो जीवनातील प्रत्येक कृत्या विषयी साशंक होतो. एकंदर तो नैराशेच्या स्थितीत जातो. तेंव्हा अशा परिस्थितीतून बाहेर पडण्यसाठी तो दिव्यत्वाकडे अर्थात ईश्वराकडे नकळत झुकत जातो.

चिंता आणि भीतीमुळे मानवी जीवनात निर्माण झालेली नैराश्याची स्थिती म्हणजेच दुःख होय. सुमारे अडीच हजार वर्षापूर्वी बुध्दांनी सांगितल्या प्रमाणे प्रत्येक दुःखाला कारण असते. परंतु मनुष्य त्या कारणांचा शोध घेण्याऐवजी निर्माण झालेल्या दुःखाला दिव्यशक्तीची अवकृपा मानतो आणि तो दुःख कमी व्हावीत म्हणून

पुन्हा ईश्वर या घटकाकडे झुकत जातो. एकंदर श्रध्दा, चिंता, भीती, दुःख या भावात्मक कारंणामुळे मनुष्य ईश्वर या कल्पनेकडे आकर्षित होतो. तर दुसरीकडे आपण ज्या विषयाप्रती श्रध्दा, विश्वास व्यक्त करीत आहोत ते श्रध्देस, विश्वासास पात्र आहे का? असा प्रश्न उपस्थित करुन तो मुनष्य संशयीत होत नाही. शिवाय निर्माण झालेल्या समस्यांना तोंड देण्यासाठी निर्भीड होत नाही आणि त्या समस्यांवर समाधान शोधण्यासाठी वैज्ञानिक व वैधानिक दृष्टिकोण बाळगत नाही अर्थात अशा अभावात्मक कारणांमुळे तो ईश्वर संकल्पणे पासून लांबही जात नाही.

अशा प्रकारे मानवी जीवनात निर्माण झालेल्या ईश्वराच्या अस्तित्वासाठी मानवाणेच निर्माण केलेल्या भावात्मक आणि अभावात्मक कारणांना मुळ कारण मानावे लागेल. परंतु मानवी जीवनातील या कारणांचा विचार केला असता असे वाटते कि, ईश्वर कल्पना ही अवास्तविक असली तरिही ती अव्यावहारिक मुळीच नाही. कारण ईश्वरावर असलेली त्यांची श्रध्दा, त्यांचा विश्वास होच त्यांच्या चिंता, भीती आणि दुःखाला त्यांच्या पासून दूर ठेवण्याचे औषध आहे. अर्थात ईश्वर आणि मानवी जीवनात त्या ईश्वराचे ज्या कारणांमुळे अस्तित्व आहे ते कारणे मानवाच्या प्रत्यक्ष व्यवहाराशी संबंधीत आहे.

सारांश:

वास्तविक पहाता सत्ताशास्त्रीय किंवा नीतिशास्त्रीय दृष्टिकोनातून ईश्वराचे अस्तित्व सिध्द करता येत नाही. तरी सुध्दा मानवी जीवनात ईश्वराचे अस्तित्व हे संकल्पना स्वरुपातून पहावयास मिळते. अशा प्रकारचे मानवी जीवनातील हे ईश्वराचे अस्तित्व असणे योग्य आहे की नाही? हा एक स्वतंत्र विषय आहे. पण ते का आहे? हे पहाणे ह्या ठिकाणचा विषय आहे. हा विषय कार्यकारण नियमाच्या सहाय्याने आपल्याला हाताळावा लागेल. मात्र त्यासाठी मानसशास्त्रीय आधारही घ्यावा लागेल.

मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून विश्वास, चिंता, भीती, नैराश्य (दुःख) हे मानवी जीवनाचे गुण-दोष आहेत. तर कार्यकारण नियमा प्रमाणे हे एक कार्य आहेत अणि त्याचे काहीतरी कारण असणार वास्तविक पहाता वर सांगितलेली ही गुणदोष सुध्दा कशाचे तरी कारण असतातच म्हणजेच ॲरिस्टाटलच्या दृष्टीने कार्य कारणात क्रम परिवर्तन होत असतो. दुसरी बाब अशी की मिलच्या दृष्टिकोनातून एका कार्याला एकच कारण नसते तर अनेक कारणे असतात. अर्थात मानवी जीवनात ईश्वर या संकल्पनेचे अस्तित्व या कार्य घटनेसाठी अनेक कारण घटना आहेत. मिल्लच्याच दृष्टिकोनाचा आधार घेत त्या कारणांचे वर्गीकरण भावात्मक व अभावात्मक स्वरुपात करता येईल. भावात्मक दृष्टिकोनातून श्रध्दा, विश्वास, चिंता, भीती, नैराश्य व दुःख इत्यादी कारणांचा या ठिकाणी उल्लेख करता येईल तर अभावात्मक दृष्टीकोनातून संशय वृत्ती, निर्भिडपणा, आत्मविश्वास व वैज्ञानिक दृष्टिकोन इत्यादींचा अभाव हे मानवी जीवनातील ईश्वर या घटकाच्या अस्तित्वासाठी कारण असल्याचे सांगता येईल.

तीसरी बाब अशी की ही सर्व कारणे मानवी जीवनाशी व त्यांच्या दैनंदीन व्यवहाराशी प्रत्यक्ष संबंध असणारी आहेत. म्हणून प्रयोजनवादी किंवा इतर जे कोणते सिध्दांत मानवी जीवनात ईश्वराचे अस्तित्व सिध्द करण्याचा प्रयत्न करतात, त्यांच्या तुलनेत आपण सांगितलेली उपरोक्त कारणे अधिक सुसंगत वाटतात.

संदर्भ :-

- निरीश्वरवाद, डॉ. याकुब मसीह, प्रस्तावना, बिहार हिंदी ग्रंथ अकादमी, पटणा १९८६
- तत्त्वज्ञानाची रुपरेषा, लेख प्रा. सुनिल काळघेम म.त.प.पृ. ७७ (प्रयोजनवादी युक्तीवाद)
- पाश्चात्य दर्शक का समीक्षात्मक इतिहास, या.मसिह, मोतीलाल बनारसीदास, पुणे पृ. १५५
- तत्त्वज्ञानाची रुपरेषा, लेख प्रा. सुनिल काळघेम म.त.प.पृ. ७९ (नैतीक युक्तीवाद)
- इस्लामची शहादत संकल्पना
- धर्माचे तत्त्वज्ञान, डॉ. निगळ /फापाळे, संस्कार निकेतन नाशिक, २०१२ पृ. १३३
- तत्रैव, पृ. ४८
- तत्रैव, पृ. ४८

❑❑❑